पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ८१**

(सभावृत्तांत)

**दिनांक – १८/०९/२०१८** **वेळ – दुपारी २.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १८/०९/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.अमित राजेंद्र गावडे
३. मा.गावडे राजेंद्र तानाजी
४. मा.आंगोळकर सागर सुनिल
५. मा.करुणा शेखर चिंचवडे
६. मा.लोंढे नम्रता योगेश
७. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
८. मा.गीता सुशिल मंचरकर
९. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१०. मा.लांडगे सारिका संतोष
११. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१२. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१३. मा.बारणे अर्चना तानाजी
१४. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.आष्टीकर – प्र.अतिरिक्त आयुक्त(१), मा.गावडे – प्र.अतिरिक्त आयुक्त(२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – मुख्य लेखापाल, मा.तुपे, मा.पठाण – सह शहर अभियंता, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे - सहाय्यक आयुक्त, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.राऊत, मा.दांगट मा.खोत, – प्र. सहाय्यक आयुक्त, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्राचार्य औ.प्र.कैंद्र, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे,

मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.औंभासे, मा.गट्टुवार, मा.गायकवाड, मा.मोरे, मा.पाटील, मा.घुबे, मा.पवार, मा.सुपेकर, मा.देशमुख, मा.शेटीया- कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी, पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषयक्र.२१) सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील ह क्षेत्रिय कार्यालयातील कामांच्या तरतूदी मध्ये वाढ/ घट करणेबाबत.

विषयक्र.२२) पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये चालविल्या जाणा-या स्पीच थेरपी सुविधा विभागास मुदतवाढ मिळणेबाबत.

विषयक्र.२३) भविष्य निर्वाह निधी १९५२ चे कायद्याची पूर्तता करणेबाबत.

विषयक्र.२४) मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ३१६२, दिनांक ११/०९/२०१८ मध्ये दुरुस्ती करणेबाबत. - मा.विकास डोळस, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

विषयक्र.२५) पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील नाल्यातील अशुध्द पाण्यावर अद्ययावत फीलट्रेशन प्लांट बसविणेकरिता सल्लागार (consultant) नेमणेबाबत. – मा.विकास डोळस, मा.अर्चना बारणे यांचा प्रस्ताव.

विषयक्र.२६) शिक्षण मंडळाचे सन २०१८-१९ करीता पांढरे व काळे बुट खरेदी करणेबाबत – मा.विकास डोळस, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव.

विषयक्र.२७) मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक २८५४, दिनांक २७/०६/२०१८ मध्ये दुरुस्ती करणेबाबत. – मा.राजेंद्र गावडे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ११/०९/२०१८ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ८०)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ३१६७ विषय क्रमांक - ०१
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – विद्युत मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा. अति.आयुक्त(१) यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/३०८/२०१८ दि.२८/०८/२०१८

विषय – मनपाच्या भोसरी येथील अंकुशराव लांडगे प्रेक्षागृह इमारतीमधील अग्नीशमन यंत्रणेसाठी नविन रिंग मॅन पाईपलाईन टाकणे व अनुषंगिक कामे करणेबाबत.

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१६८ विषय क्रमांक - ०२
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – लेखा
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/१०१४३/२०१८ दि.०३/०९/२०१८

विषय - "फ क्षेत्रिय" कार्यालय स्थापत्य या विभागाकडील सन२०१८-१९ च्या अंदाजपत्रकामधील कामांच्या अंतर्गत तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत.

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१६९ विषय क्रमांक - ०३
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – बांधकाम परवानगी व अनाधिकृत/ अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बीपी/०५/कावि/३३०/२०१८ दि.०४/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड म.न.पा.कार्यक्षेत्रातील रस्ता/फुटपाथ, मनपाच्या सार्वजनिक मोकळया जागेवरील अतिक्रमण काढणेकामी अ, ब, क, ड, ई, फ, ग व ह याक्षेत्रीय कार्यालयातील अतिक्रमण विभाग निरस्त करून मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र.प्रशा/२/कावि/१९२/२०१८ दि.२४/५/२०१८ अन्वये बांधकाम परवानगी व अनाधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन विभाग स्थापन करणेत आले आहे. सदर अतिक्रमण विभागाचे वतीने अनाधिकृत/ विनापरवाना हातगाडया/टप-यांवर एकत्रीत कारवाई मोहीम राबविण्यात येते. कारवाईत जप्त केलेले साहित्य वरिष्ठाच्या सूचनेनुसार नेहरूनगर गोडाऊन येथे एकत्रीतरित्या जमा करणेत येते. काही व्यावसायिकांनी हातगाडया/टप-या व जप्त केलेले साहित्य परत मिळणेकामी अर्ज या कार्यालयाकडे प्राप्त झालेले

आहेत. तथापि, अतिक्रमण विभागातील अधिकारी/कर्मचारी, मशीनरी यांचा खर्च वसूल करणेकामी मा.स्थायी समिती ठराव क्र.२९६३ दि.२५/७/२०१८ च्या अनुषंगाने मा.आयुक्त यांचेकडील दि.२/८/२०१८ रोजीचे आदेशानुसार प्रशासकीय शुल्क आकारण्यात आलेआहे. सदर प्रशासकीय शुल्का पेक्षा हातगाडी, टपरी इत्यादीची प्रत्यक्षातील किंमत कमी असल्याने प्रशासकीय शुल्क आकारून परत नेण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. तसेच जप्त केलेले साहित्य ठेवण्यासाठी आता जागा शिल्लक नाही. त्यासाठी सदर दर तर्क आधारित ठेवणे आवश्यक आहे.सबब पूर्वीच्या दरा मध्ये खालील प्रमाणे सुधारित दर आकरणेचा प्रस्ताव आहे.

| **अ.क्र.** | **प्रशासकीय शुल्क वसुलीबाबतचा तपशिल (कोणत्या गोष्टीकरीता वसुल करावायाचा)** | **चालू प्रशासकीय शुल्क रुपये** | **सुधारित प्रशासकीय शुल्क रुपये** | **तरतुद** |
|---|---|---|---|---|
| १ | हातगाडी/पथारी यांचे रस्त्यावरील अतिक्रमण | ६४००-/ | ३०००/- | महाराष्ट्र प्रातिंक महानगरपालिका अधिनियम कलम २३०,२३१ तसेच कलम४३८(२)(१)नुसार(३) |
| २ | टपरी स्थिर फेरीवाले यांचे अतिक्रमण | १२८००/- हातगाडी/टपरी | ६०००/- | |
| ३ | इतर किरकोळ साहित्य | २५००-/ | १०००/- | |
| ४ | महापालिका परिसरात फळविक्री/ चिकन/भाजीवाले विक्री व इतर व्यवसाय करणेसाठी वाहनाचा वापर करणारे व्यवसायिक वाहनचालक यांचेकडून शुल्क आकार | ३८४००-/ | १५०००/- | |

तरी वरीलप्रमाणे प्रशासकीय शुल्क वसूल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१७० विषय क्रमांक - ०४

दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.करुणा चिंचवडे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०५/कावि/५७८/२०१८ दि.०१/०८/२०१८

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाचे विविध विभागांकडील कॅनन कंपनीचे प्रिंटरसाठी आवश्यक Genuine Toner/Cartridge खरेदीकामी केंद्र शासनाकडील Gem, government,e-market plus वर ऑनलाईन Bid Number-GEM/2018/B/52536 व Bid Number-GEM/2018/B/52561 अन्वये दर मागविणेत आले होते. त्यानुसार तीन बिडरकडून ऑनलाईन दर प्राप्त झालेले आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.मोनार्च टेक्नॉलॉजीस (पुणे) प्रा.लि.पुणे-०४ यांचे टोनर (कॅनन मेक) बाब क्र.१ व २ एकूण-३८० नग साहित्यासाठी

र.रु.१५,९७,६४०/-(अक्षरी र.रू.पंधरा लाख सत्याण्णव हजार सहाशे चाळीस फक्त) लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा १७.३०% ने कमी असल्याने प्रस्तूतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१७१ विषय क्रमांक - ०५
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – विद्युत/यांत्रिकी
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.सहशहर अभियंता(वि/यां) यांचे जावक क्र.विमुका/४/कावि/२८०/२०१८ दि.१०/०९/२०१८

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील सोबतचे प्रपत्र अ (1 ते 4) मधिल निविदा कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१७२ विषय क्रमांक - ०६
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१४८/२०१८ दि.११/०९/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.२०/०८/२०१८ ते दि.२६/०८/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१४८/२०१८ दि.११/०९/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१७३ विषय क्रमांक - ०७
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१४६/२०१८ दि.११/०९/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.०६/०८/२०१८ ते दि.१२/०८/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१४६/२०१८ दि.११/०९/२०१८अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१७४ विषय क्रमांक - ०८
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१४७/२०१८ दि.११/०९/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षणविभागातील दि.१३/०८/२०१८ ते दि.१९/०८/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचामा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१४७/२०१८ दि.११/०९/२०१८अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१७५ विषय क्रमांक - ०९
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे जावक क्र.मातंवि/११/कावि/४९२/२०१८ दि.२९/०९/२०१८

मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

नागरवस्ती विकास योजना अंतर्गत कार्यरत सर्व लाभांच्या योजनांचे संपुर्ण कामकाज संगणकीकृत करणेबाबत व त्यांचे इंटिग्रेशन करणेकामी नागरवस्ती विभागाच्या संगणक प्रणाली मधील करावयाच्या बदलांची निकड व तातडीची बाब विचारात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अनुसुची प्रकरण ५नियम २(२) चे नुसार निविदा प्रसिद्ध न करता थेट पद्धतीने परंतू करारनामा करून मे.प्रोबिटी सॉफ्ट प्रा.लि., पुणे यांचेमार्फत उपरोक्त नमुद संगणक प्रणाली मधिल बदल करणे बाबतचे कामकाज करून घेणेस येणा-या र.रू.१४,७७,५००/- अधिक वस्तु व सेवा कर र.रु.२,६५,९५०/- असे एकुण र.रु.१७,४३,४५०/- (अक्षरी र.रू.सतरा लाख त्रेचाळीस हजार चारशे पन्नास फक्त) व त्या अनुषंगाने येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ३१७६ विषय क्रमांक - १०
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.करुणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/६०९/२०१८ दि.१०/०९/२०१८

विषय – महापालिकेचे विविध विभागांकडील कॅनन कंपनीचे प्रिंटरसाठी आवश्यक Genuine Toner / Cartridge खरेदीबाबत.

विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१७७ विषय क्रमांक - ११
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – इ क्षेत्रीय, आरोग्य
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/आ/२/कावि/४६८/२०१८ दि.०५/०९/२०१८

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात औष्णिक धुरीकरण करण्यासाठी वॅन फॉग मशिन ठेवुन कामकाज करण्यासाठी आवश्यक डिझेलवर चालणारे तीन चाकी रिक्षा टेम्पो वाहनचालकासह भाड्याने घेणे या कामाची नि.नो.क्र.2/2018-19 अन्वये निविदा र.रु.5,75,400/- वर्तमानपत्रा मध्ये प्रसिध्द करुन दर मागविण्यात आले आहेत. सदरची निविदा दि.18/08/2018 रोजी उघडण्यात आली आहे. सदर निविदाचे अनुषंगाने मे. श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था यांनी अंदाजपत्रकीय र.रु.5,75,400/- (अक्षरी र.रू.पाच लाख पंच्याहत्तर हजार चारशे फक्त) पेक्षा प्रति दिन प्रति रिक्षा र.रु.599/- कमी दराने प्राप्त झालेली आहे.याकामी त्यांचेबरोबर करारनामा करुन घेतला असून कामाचे आदेश देणेत आले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१७८ विषय क्रमांक - १२
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/१/कावि/७६२/२०१८ दि.१२/०९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्रविपसू/३०१८ /प्र.क्र.४९३/नवि २२ नगर विकास विभाग दि.१७/७/२०१८ चेपत्रान्वये नागपूर येथे अँड जयदेव गायकवाड, महाराष्ट्र विधानपरिषद नियम९३अन्वये दिलेली सुचना क्र.७९ (प्रत सलग्न) नुसार उपस्थित

राहून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेशी सबंधित असलेली माहिती त्वरीत शासनास पाठविणेकामी कळविणेत आले होते. त्यास अनुसरून महानगरपालिकेचे वतीने आदेश स्था/शअ/तां/४/२२१-अ/२०१८ दि.१८/७/२०१८ श्री.चव्हाण अंबादास व्यकंटेश शहर अभियंता श्री.गायकवाड जीवन कृष्णा, कार्यकारी अभियंता व श्री.जयकुमार गुजर कनिष्ठं अभियंता हे दि.१९/७/२०१८ ते २१/७/२०१८ या कालावधी मध्ये नागपूर येथे उपस्थित राहिले होते तदनंतर सर्व सबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी दि.२१/७/२०१८ रोजी सांय ६:३० चे दरम्यान खाजगी वाहनाने नागपूर ते पुणे प्रवास केलेला आहे प्रवासा बाबतचा विमान खर्च र.रु.२४,१६९/- (अक्षरी र.रू.चोवीस हजार एकशे एकोणसत्तर फक्त) सर्व सबंधितांनी केलेला असून सदर बीलांची प्रतिपूर्ती करून देणे आवश्यक आहे. उक्त प्रस्ताव मान्य असणेस श्री.चव्हाण अंबादास व्यकंटेश, शहर अभियंता श्री.गायकवाड जीवन कृष्णा, कार्यकारी अभियंता व श्री.जयकुमार गुजर, कनिष्ठं अभियंता हे दि.१८/७/१८ ते २१/७/२०१८ कालावधीमध्ये नागपूर अधिवेशनास उपस्थित राहिलेने येणा-या प्रवास व दैनिक भत्तासह र.रु.२४,१६९/- (अक्षरी र.रू.चोवीस हजार एकशे एकोण सत्तर फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१७९ विषय क्रमांक - १३
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/९५५/२०१८ दि.११/०९/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१८० विषय क्रमांक - १४
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – मध्यवर्ती औषध भांडार
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.करुणा चिंचवडे
संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे जावक क्र.YCMH/भांडार/१/कावि/२८१/२०१८ दि.१०/९/२०१८

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाणस्मृती रुग्णालयातील एक्स-रे विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने रेडिएशन मॉनिटरींग डिव्हाईस वापरणेत येत असते. सदर डिव्हाईस/रेडिएशन बॅजेस (टी.एल.डी.बॅजेस) दर त्रैमासिक तपासणीकामी मे.रेनेनटेक लॅबोरेटरिज

प्रा.लि.गोरेगांव, मुंबई यांचेकडे पाठविले जातात. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता रेडिएशन बॅजेस तपासणीकामी अदा केलेल्या र.रु.२७,८०७/- (अक्षरी र.रु.सत्तावीस हजार आठशे सात फक्त) तसेच सन २०१८-१९ करिता रेडिएशन बॅजेस तपासणीकामी आवश्यक र.रु.२१,८८८/- (अक्षरी र.रु.एकवीस हजार आठशे अठ्ठ्याऐंशी फक्त) मे.रेनेनटेक लॅबोरेटरिज प्रा.लि.गोरेगांव, मुंबई यांना आगाऊ स्वरुपात अदा करणेत आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१८१ विषय क्रमांक - १५
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – लेखा
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/१०७६०/२०१८ दि.१४/९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

क्षेत्रिय अधिकारी ग क्षेत्रिय कार्यालय यांनी दि.२८/०८/२०१८ चे प्रस्तावान्वये ग क्षेत्रिय कार्यालयाकडील स्थायी अस्थापना लेखाशिर्षावरील तरतूद माहे सप्टेंबर २०१८ ते माहे फेब्रुवारी २०१९ या महिन्यांकरिता वेतन अदायगी करिता तरतूद कमी पडत असल्याने र.रू.७०,००,०००/-तरतूद वाढवून मिळणेची विनंती केलेली आहे. र.रू.६२,६५,०००/- तरतूद केलेली असुन र.रू.६२,९९,४८५/- खर्च झालेले असून र.रू.७,००,५१५/- तरतूद शिल्लक आहे. ग क्षेत्रिय कार्यालयाकडे वाहनचालक, लेखाधिकारी, लेखापाल, लिपिक यांची नव्याने नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच मा.अध्यक्ष, प्रभाग समिती व प्रशासन अधिकारी खाजगी वाहन वापर करीत आहेत्यांचे बिल अदायगी साठी स्वतंत्र लेखाशिर्ष नाही स्थायी अस्थापना लेखाशिर्षातुन तरतूद खर्ची टाकणेत येत आहे यासाठी र.रू.७०,००,०००/- वाढीव तरतूदीची आवश्यकता आहे. अखर्चित निधीतून स्थायी अस्थापना लेखाशिर्षावर र.रू.७० लाख वाढ करून वर्ग करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१८२ विषय क्रमांक - १६
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – मध्यवर्ती औषध भांडार
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ–मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/३८५/२०१८ दि.१२/९/२०१८

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या डायलिसिस विभागातील गॅम्ब्रो कंपनीची डायलिसीस

मशीन (Sr.No.7589) च्या दुरुस्तीकामी आवश्यक पार्टस खरेदी करणेसाठी संबंधित कंपनी M/s.Baxter India Pvt.Ltd यांनी एकूण र.रु.१,२३,४००/- चेदरपत्रक सादर केले असुन सदरचे दरपत्रक स्विकृत करण्यात आले आहे.त्यानुसार यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या डायलिसिस विभागातील गॅंब्रो कंपनीची डायलिसीस मशीन (Sr.No.7589) च्या दुरुस्तीकामी आवश्यक पार्टस खरेदीसाठी संबंधित कंपनी M/s.Baxter India Pvt.Ltd यांचे अधिकृत स्पेअर पार्ट वितरक M/S.VEE AAR TECH SOLUTION, New Delhi यांचेकडून निविदा न मागवता, करारनामान करता मनपा अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५(२)(२) नुसार थेट पध्दतीने खरेदी करण्यास व सदर खरेदीस होणारा खर्च र.रु.१,२३,४००/-(अक्षरी र.रु.एक लाख तेवीस हजार चारशे फक्त) ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१८३ विषय क्रमांक - १७

दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – मध्यवर्ती औषध भांडार

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ– मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/३८४/२०१८ दि.१२/९/२०१८

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या डायलिसीस विभागाने मागणी केलेनुसार त्यांचे विभागातील R.O.Plant with Prefiltration Plant चे AMC संबंधित कंपनीचे अधिकृत वितरक मे.क्रिदय हेल्थकेअर, पुणे यांचेकडून त्यांनी सादर केलेले दरपत्रक एकूण र.रु.४२,६३०/-(अक्षरी र.रु.बेचाळीस हजार सहाशे तीस फक्त) नुसार मनपा अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ (२) (२) नुसार नुसार निविदा नमागविता, थेट पध्दतीने, करारनामा करुन AMC चा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने AMC साठी होणा-या खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१८४ विषय क्रमांक - १८

दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – जलनि:सारण

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जनि/२/कावि/१६१३/२०१८ दि.१२/९/२०१८

विषय – काळेवाडी, रहाटणी भागातील पवना नदीच्या कडेने मुख्य गुरुत्व वाहिनीची सुधारणा विषयक कामे करणे

विषय क्रमांक १८ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१८५ विषय क्रमांक - १९
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – नगरसचिव
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.नगरसचिव यांचे जावक क्र.नस/१/कावि/९५२/२०१८ दि.१४/९/२०१८

मा.नगरसचिव यांनी शिफारस केले प्रमाणे –

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१८६ विषय क्रमांक - २०
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – क क्षेत्रीय, आरोग्य
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/आ१५ब/कावि/९१३/२०१८ दि.१४/९/२०१८

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत महापालिकेचे सर्व क्षेत्रीय कार्यालयांचे कार्यक्षेत्रात नागरिकांमध्ये उघड्यावर शौच करणेचे आरोग्यास होणारे घातक परिणाम व ते टाळणेकामी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत त्यांनी त्यांचे घरात वैयक्तिक शौचालय बांधणेकामी अर्ज करणेसाठी प्रोत्साहन देणे व त्याकरिता महापालिकेने करावयाचे कामकाज या बाबतचा तपशील व इतर मार्गदर्शक तत्वे श्री.प्रवीण प्रकाश, भा.प्र.से संयुक्त सचिव व मिशन निदेशक (एस.बी.एम) शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे कडील अर्ध शासकीय पत्र क्रमांक डी.ओ.क्र.SB/SBM/29/2016 दिनांक २९/३/२०१६ मध्ये नमूद करणेत आली आहे. त्या अंतर्गत Open defecation spot चे ठिकाणी स्वच्छता दुतांची नेमणुक करणेकामी कळविले होते. त्यानुसार मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्वमअक/१/कावि/१३९/२०१६ दिनांक १९/१२/२०१६ अन्वये क क्षेत्रीय कार्यालयांतर्गत एकूण ९ (नऊ) स्वच्छता दुतांची Open defecation spot चे ठिकाणी नागरीकांचे प्रबोधन करून नागरीकांमध्ये जनजागृती करणेचे कामकाज करणेसाठी नेमणूक करणेत आली आहे. त्यांना प्रत्येकी र.रु.५०००/- एकत्रीत मानधन द्यावयाचे आहे. त्यासाठी एकूण येणा-या र.रु.४५,०००/- (अक्षरी र.रु. पंचेचाळीस हजार फक्त) अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ३१८७ विषय क्रमांक - २१
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – लेखा
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/१०९०४/२०१८ दि.१८/९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे

शहर अभियंता, स्थापत्य विभाग यांनी ११/०९/२०१८ रोजीचे प्रस्तावानुसार स्थापत्य ह क्षेत्रिय कार्यालयाकडील प्रस्तावात नमूद प्रमाणे रक्कम रुपये ५,८९,९७,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच कोटी एकोणनव्वद लाख सत्याण्णव हजार फक्त) इतकी तरतुद विशेष योजना लेखाशिर्षामधील कामांमध्ये विभागांतर्गत (वाढ/घट) वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१८८ विषय क्रमांक - २२
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – वाय.सी.एम.एच.
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्ता यांचे जावक क्र.वायसीएमएच/११/कावि/३८४/२०१८ दि.१४/९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये जन्म जात कर्णबधीर बालकांसाठी त्यांना बोलता येण्यासाठी (Speech Therapy) सुविधा उपलब्ध करुण देणेसाठी सुरु करणेत आलेला Speech Therapy विभागास दि.२४/०९/२०१७ ते २३/०९/२०१८ या १ वर्षासाठी मुदतवाढ देणेस व र.रू.६,०००/- (प्रती प्रशिक्षित शिक्षक) असे एकूण र.रू.१२,०००/- (अक्षरी र.रू.बारा हजार फक्त) दरमहा मानधन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१८९ विषय क्रमांक - २३
दिनांक – १८/०९/२०१८ विभाग – आरोग्य
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/८/कावि/२२४/२०१८ दि.१८/९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे

भविष्य निर्वाह निधीचे १९५२ चे कायद्यानुसार माहे जानेवारी २०११ ते नोव्हेंबर २०१३ व माहे डिसेंबर २०१३ ते मार्च २०१५ या कालावधीतील भविष्य निर्वाह निधीची रक्कम कर्मचा-यांचे खात्यावर

भरणेपर्यंतचे संपूर्ण कामकाजासाठी थेट पध्दतीने नेमणूक करणेस मान्यता देण्यात येत असून सदर कामकाज यापूर्वी आदेश क्रमांक काक/३/कावि/२४८/२०१७, दिनांक ०२/०८/२०१७ अन्वये मे. त्रिमूर्ती कन्स्लटन्सी यांनी केलेले असल्याने वरील नमूद कामकाज देखील त्यांचेकडून करुन घेणेकामी रक्कम रुपये ३,३५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख पस्तीस हजार फक्त) अदा करावयाच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१९० विषय क्रमांक - २४

दिनांक – १८/०९/२०१८

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव

मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ३१६२, दिनांक ११/०९/२०१८ मधील प्रभाग क्रमांक २० कासारवाडी येथे विद्याविकास शाळेजवळ सुलभ शौचालय बांधणे (पैस द्या व वापरा तत्वावर) हे काम मे. सुलभ इंटरनॅशनल या संस्थेकडून करुन निविदा न मागविता काम थेट पध्दतीने करणे व सदर शौचालया अंतर्गत पुरुषांकरिता तेवीस संडास, पाच मुता-या व स्त्रियांकरिता २२ संडास, अपंगांसाठी एक व केअर टेकर रुम बांधणे यासाठी येणा-या स्थापत्य व विद्युत यांच्या एकत्रित खर्चास अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ८३,१३,८६८/- व त्यावर कार्यवाही भार शुल्क १५% याप्रमाणे करारनामा करुन घेऊन काम थेट पध्दतीने देणे. कामाची मुदत १२ महिने तसेच सदर कामासाठी वर्कऑर्डर सोबत ३०% अडव्हान्स व प्लिंथ लेव्हल पर्यंत काम झाल्यानंतर दुसरा ३०% अडव्हान्स आर.सी.सी. व वीट बांधकाम पूर्ण झालेनंतर ३०% रक्कम व उर्वरीत १०% रक्कम काम पूर्ण झालेवर देण्याच्या प्रस्तावास व त्यासाठी येणा-या एकूण रक्कम रुपये ९३,९४,६७१/- (अक्षरी रक्कम रुपये त्र्याण्णव लाख चौ-याण्णव हजार सहाशे एक्काहत्तर फक्त) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१९१ विषय क्रमांक - २५

दिनांक – १८/०९/२०१८

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.अर्चना बारणे यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नाल्यांमधील अशुध्द पाणी प्रक्रिया न करता शहरातील नद्यांमध्ये जाते. तसेच काही नाल्यांच्या कडेने अनेक भंगारांची दुकाने असून सदर व्यावसायिक ऑईल, केमिकल इत्यादींची विल्हेवाट सदर नाल्यामध्ये करतात. त्यामुळे नाल्यातील दुषित पाण्यामुळे शहरातील नद्यांमध्ये प्रदूषण वाढत आहे तरी नाल्यातील अशुध्द पाण्यावर

अद्ययावत फिलट्रेशन प्लांट बसवून त्या पाण्यावर प्रक्रिया करुन ते नद्यांमध्ये सोडणे या कामाकरिता पाणीपुरवठा व जलनि:सारण आणि पर्यावरण विभागसाठी सल्लागार नेमणेकामी मान्यता देणेत येत असून सदर कामाकरिता M/s Bluestream Infrastrucutre Development Consultant Private Limited कर्वे रोड, पुणे यांची पाणीपुरवठा व जलनि:सारण आणि पर्यावरण विभागासाठी सल्लागार म्हणून नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१९२ विषय क्रमांक - २६

दिनांक – १८/०९/२०१८

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील प्राथमिक शाळेतील प्रत्यक्ष हजर विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली ते ७ वी च्या शालेय विद्यार्थ्यांची परिस्थिती बिकट असल्याने व विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून मनपा मार्फत काळे व पांढरे बूट व दोन जोड मोजे पुरविणे आवश्यक आहे. यापूर्वी करारनाम्यानुसार मे. संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मेकार विकास महामंडळ (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम) नमूद झालेल्या साहित्याचा मागील वर्षीच्या शासन मान्य पुरवठाधारकाकडून सदरचे साहित्य त्यात कोणत्याही प्रकारची दरवाढ न करता मागील वर्षाच्या मंजूर लघुत्तम दराने केलेला करारनामा व पुरवठा आदेशातील अटी शर्ती नुसार सन २०१८-१९ साठी पुरवठा वाटपाचे आदेश देऊन पुरवठा आदेशात नमूद केल्याप्रमाणे काळे व पांढरे पी.टी. बूट व मोजे खरेदी करण्यास व तात्काळ पट संख्ये प्रमाणे वाटप करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१९३ विषय क्रमांक - २७

दिनांक – १८/०९/२०१८

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.राजेंद्र गावडे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव

मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक २८५४, दिनांक २७/०६/२०१८ नुसार महापालिके मार्फत नागरिकांना देणेत येणा-या सेवांमध्ये सुधारणा करण्यासाठी शहर परिवर्तन कार्यालयामार्फत नागरिकांचे सर्वेक्षण करणेचे कामासाठी शहरातील नागरी सुविधा केंद्र, कोपा/पासाचे विद्यार्थी, स्वयंसेवक यांचे माध्यमातून सर्वेक्षण फॉर्म भरुन घेण्याचे कामकाजासाठी प्रत्येकी फॉर्मचे कामासाठी रक्कम रुपये १५/- याप्रमाणे मानधन अदा करणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा.स्थायी समिती ठराव क्र.२८५४ दिनांक २७/६/२०१८ अन्वये मान्यता दिली असून सदर ठरावात "यासाठी शहरातील

नागरी सुविधा केंद्र, कोपा/पासाचे विद्यार्थी, स्वयंसेवक यांचे माध्यमातून हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपीमध्ये फॉर्म भरुन घेऊन सर्वेक्षणाचे कामकाज पुर्ण करावयाचे आहे", या ऐवजी "यासाठी शहरातील नागरी सुविधा केंद्र, कोपा/पासाचे विद्यार्थी, स्वयंसेवक यांचे माध्यमातून हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपीमध्ये फॉर्म भरुन घेऊन सर्वेक्षणाचे कामकाज पूर्ण करावयाचे आहे" अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक- नस/३/कावि/११०७/२०१८
दिनांक - १९/०९/२०१८

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.विमुका/४/कावि/२६०/२०१८ दि.१०/९/२०१८ विषय क्र.५ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी१८
विद्युत विभाग

क्र. विमुका/४/कावि/२६०/२०१८, दि. १०/९/२०१८ प्रपत्र - अ

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाच्या आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | विमलाई इलेक्ट्रीक कार्पोरेशन | 31/2-2017/18 | सांगवी येथील मधुबन सोसायटी येथील आरक्षण क्र. 316, सर्वे न. 26 उद्यान विकसीत करणे कामातंर्गत उर्वरित विद्युत विषयक कामे करणे. | 05/06/2018 | विमुका/5/कावि/231/2018 | दि. 18.6.2018 | 1392612 | 22.87% कमी |
| 2 | मे. कॉमटेक टेलिसोल्युश्स | 23/2-2017/18 | मनपा प्रशासकिय इमारतीमध्ये विविध ठिकाणी सी.सी.टिव्ही यंत्रणा उभारणे. | 18/04/2018 | विमुका/4/कावि/ 272/2018 | दि. 17.7.2018 | 1400200 | 3.35% कमी |
| 3 | मे. पी. एम. के. इलेक्ट्रीकल्स | 18/24-2017/18 | मुंबई पुणे महामार्गावरील दिवाबत्तीची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. व तद्अनुषँगिक कामे करणे.(सन 2017/18) | 30/05/2018 | विमुका/8/कावि/ 273/2018 | दि.22/6/2018 | 999826 | 6.75% कमी |
| 4 | मे. पी.एम.के. इलेक्ट्रीकल्स | 5/21-2017/18 | ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत वाकड उपविभाग परिसरातील शहरी गरब वस्तीत आवश्यकतेनुसार जुने व गंजलेले खांब बदलणे व अनुषँगिक कामे करणे. | 30/11/2017 | विमुका/8/कावि/26/2018 | दि.10/1/2018 | 950857 | 13.01% कमी |
| | | | | | | | **4743495** | |

सहशहर अभियंता(वि/यां)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८